साप्ताहिक

''एकच ध्येय... एकच आवाज''

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २४ वा | सोमवार, दि. २९/०६/२०२६ ते दि. ०५/०७/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

# धुळ्यात पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन; १.८२ लाख बालकांना पोलिओ डोसचे उद्दिष्ट

## जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेचा शुभारंभ

धुळे– धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे जिल्हास्तरीय उद्घाटन रविवारी उत्साहात पार पडले. जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा रुग्णालय येथे पार पडलेल्या या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे मुंबई शहरी विभागाचे संचालक डॉ. प्रसाद भंडारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे, महिला व बाल रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अश्विनी भामरे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. स्वप्नील पाटील, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक जाधव, डॉ. गीतांजली सोनवणे तसेच विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि परिचारिका प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील १ लाख ८२ हजार ८४३ बालकांना पोलिओचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी १५०८ लसीकरण केंद्रांवर ३२६० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून ६३ ट्रान्झिट पथके आणि ९१ मोबाईल पथके कार्यरत राहणार आहेत. सर्व लसीकरण केंद्रांवर पोलिओचे दोन थेंब देण्यात येतील. त्यानंतर पुढील पाच दिवस घरोघरी जाऊन एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.पोलिओ पासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अत्यंत प्रभावी आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजून या मोहिमेला यशस्वी करावे. कोणतेही पात्र बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी आरोग्य विभागाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. प्रत्येक पालकाने आपल्या बालकाला पोलिओचा



डोस देऊन १०० टक्के लसीकरण मोहिमेला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. लाखो उमेदवारांचे भविष्य टांगणीला; सेवेत राहण्यासाठी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांनाही मोठा फटका

NEET नंतर आता शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपरफुटीची घटना समोर आल्याने महाराष्ट्रातील परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा एकदा डळमळीत झाला आहे. ठाण्यात TET परीक्षेचा पेपर फुटल्याने उद्या होणारी परीक्षा रद्द करण्याची वेळ आली असून, यामुळे तब्बल ४ लाख २८ हजारांहून अधिक उमेदवारांवर अन्याय झाला आहे. ही केवळ पेपरफुटीची घटना नसून, राज्यातील भ्रष्ट आणि ढासळलेल्या परीक्षा व्यवस्थेचे अपयश असल्याची टीका विधान परिषद आमदार सत्यजीत तांबे यांनी केली.

तांबे म्हणाले की, महाराष्ट्रात आता 'पेपरफुटी' हीच नवी 'परीक्षा पद्धत' झाली आहे का, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. काही दिवसांपूर्वी छएएढ, उइडए मूल्यांकनातील गोंधळ, णऋ–छएढ तसेच विविध प्रवेश आणि भरती परीक्षांमधील अनियमिततेमुळे लाखो विद्यार्थ्यांची मेहनत, वेळ आणि पैसा वाया गेला. या सर्व घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक नैराश्य आणि असुरक्षिततेची भावना वाढत आहे.

TET प्रकरण इतर परीक्षांपेक्षा अधिक गंभीर असल्याचे सांगताना तांबे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार अनेक शिक्षकांना सेवेत कायम राहण्यासाठी ढएढ परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. त्यामुळे २० ते ३० वर्षे सेवा केलेले आणि निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले शिक्षकही नोकरी वाचवण्यासाठी ही परीक्षा देत आहेत. अशा वेळी पेपरफुटी होणे म्हणजे त्यांच्या नोकरीवर आणि कुटुंबाच्या भवितव्यावर घाला घालण्यासारखे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास ८० वर्षे झाली. जग –ख आणि सायबर सुरक्षेच्या युगात पोहोचले आहे. मात्र आपण अजूनही परीक्षा सुरक्षित घेऊ शकत नाही, चझडउ चे निकाल वेळेत लावू शकत नाही, परीक्षा कधी ऑनलाइन तर कधी ऑफलाइन अशा गोंधळात अडकलेल्या आहेत. ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे, असेही त्यांनी नमूद केले. तांबे यांनी सांगितले की, परीक्षा व्यवस्थेतील या त्रुटींविषयी त्यांनी नुकतेच विधान परिषदेत सरकारचे लक्ष वेधले होते. मी तेव्हाही स्पष्ट सांगितले होते की, या संपूर्ण व्यवस्थेच्या मुळाशी भ्रष्टाचार आहे. व्यवस्था पारदर्शक झाली तर अनेकांचे हितसंबंध धोक्यात येतील. त्यामुळे काहींना ही व्यवस्था सुधारलेलीच नको आहे, असा माझा ठाम आरोप आहे, असे ते म्हणाले. केवळ आरोपींना अटक करून हा प्रश्न सुटणार नसल्याचे सांगत तांबे यांनी परीक्षा प्रणालीची संपूर्ण पुनर्रचना करण्याची मागणी केली. ही केवळ पेपरफुटी नाही, तर बरबटलेल्या व्यवस्थेचा पर्दाफाश आहे. सरकारने हा अन्याय तातडीने थांबवून परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास पुन्हा प्रस्थापित करावा, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली.

# पथविक्रेत्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त असलेल्या पीएम स्वनिधी योजनेचा लाभ घ्यावा–अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांचे आवाहन

धुळे – केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री स्वनिधी योजना २.० अंतर्गत धुळे महानगरपालिकेमार्फत लोककल्याण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन माननीय आयुक्त नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सन्माननीय उपमहापौर ज्योत्स्ना ताई पाटील, महिला व बालकल्याण सभापती उज्वला ठाकरे, नगरसेवक गणेश जाधव, कृपेश नांद्रे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख मार्गदर्शन अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांनी केले. यावेळी लीड बँकेचे व्यवस्थापक एम. एम. ढेले, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष व फेरीवाला समितीचे पदाधिकारी नितीन बंग, समाज विकास अधिकारी मीना सातभाई तसेच भारतीय स्टेट बँक, युनियन बँक, यूको बँक, सेंट्रल बँक आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांसह विविध बँकांचे व्यवस्थापक उपस्थित होते. मार्गदर्शन करताना अतिरिक्त आयुक्त करुणा डहाळे यांनी प्रधानमंत्री स्वनिधी योजनेचा इतिहास, वैशिष्ट्ये, लाभार्थी पात्रता निकष तसेच योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध सुविधांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, धुळे महानगरपालिकेमार्फत पहिल्या टप्प्यात ९,४४९ लाभार्थ्यांना ९.५१




कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले असून दुसऱ्या टप्प्यात ३,०७२ लाभार्थ्यांना ६.५९ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. तिसऱ्या टप्प्यात ४८६ लाभार्थ्यांना २.४५ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. तसेच डिजिटल व्यवहार प्रोत्साहनांतर्गत ७,०५१ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे.

यावेळी पीएम स्वनिधी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'स्वनिधी से समृद्धी' अभियानासह प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, पीएम श्रमयोगी मानधन योजना आणि वन नेशन वन रेशन कार्डयोजनेबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. लोककल्याण मेळाव्यात ५० लाभार्थ्यांना कर्ज मंजुरीपत्रांचे, दोन लाभार्थ्यांना क्रेडिट कार्डचे तर १२ लाभार्थ्यांना क्यूआर कोडचे वितरण करण्यात आले. तसेच उपस्थित लाभार्थ्यांनी विविध समस्या मांडल्या असता, संबंधित बँकांच्या व्यवस्थापकांनी त्यांचे तत्काळ निराकरण केले.

मेळाव्यास लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी व्हिडिओ प्रस्तुतीकरणाद्वारे योजनेविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समुदाय संघटक सुनील सरदार, धम्मदीप सावंत, छाया पाटील, सुनिता निकम, मोहन गवळी आणि संगीता जांभळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना–ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी!

**विशेष लेख...**

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्त्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती क्षेत्र हे अन्न सुरक्षा, रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.

तथापि, गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाणीटंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. याच्या निराकरणासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे, यासारखेही प्रयत्न केले जात आहेत. मात्र, आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. परिणामी, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना –२०२६' महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांचा मानसिक तणाव कमी होतो. तसेच, त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'मुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे. तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना – राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळपिक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळपिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

कृषी क्षेत्रात एआयचा वापर – कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा (AI) वापर महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी 'महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)' २०२५–२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी– विक्रीसाठी एआय आधारित प्लॅटफॉर्म विकसित करण्यात येणार आहेत. कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन – शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे. कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत. राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:

- ❋ सिंचन सुविधांचा विस्तार
- ❋ पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
- ❋ शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
- ❋ साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
- ❋ शेतीमालाला योग्य व हमीभाव.
- ❋ शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
- ❋ कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
- ❋ हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**– वर्षा फडके–आंधळे**

उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये इंटर हाऊस इन्स्ट्रुमेंटल बँड स्पर्धा उत्साहात संपन्न




शिरपूर – अमरिशभाई आर. पटेल सीबीएसई स्कूल मध्ये दि. २७ जून २०२६ शनिवार रोजी इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी इंटर हाऊस इन्स्ट्रुमेंटल बँड स्पर्धेचे दिमाखदार आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत चारही हाऊसमधील जवळपास पन्नासहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

एम्बर हाऊस, एमराल्ड हाऊस, सफायर हाऊस आणि रुबी हाऊस या चारही गटांनी विविध वाद्यांच्या माध्यमातून उत्कृष्ट संगीत सादर करत आपल्या संघभावना, तालबद्धता आणि कलात्मकतेची प्रभावी छाप पाडली. संपूर्ण परिसर सुरेल संगीताने भारावून गेला आणि स्पर्धा आनंद, उत्साह व चैतन्यपूर्ण वातावरणात पार पडली. या स्पर्धेसाठी योगेश गुरव यांनी परीक्षक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे बारकाईने परीक्षण केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक सफायर हाऊस, द्वितीय एम्बरल्ड, तृतीय एम्बर, व चतुर्थ रुबी हाऊस त्यांनी बाजी मारली. सहभागी सर्वच विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाचे तोंडभरून कौतुक करत संगीत क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मक अभिव्यक्तीचे आणि संगीतप्रेमाचे विशेष कौतुक केले. शिरपूर एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, प्राचार्या सौ. स्मिता उगले यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट करत स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षक व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व पदाधिकारी यांनी 'मन की बात' कार्यक्रमाचा घेतला लाभ

शिरपूर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या १३५ व्या भागाचे प्रसारण रविवारी, दि. २८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जनक विला, शिरपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात ऐकण्यात आले. यावेळी माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांनी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या समवेत कार्यक्रमाचा लाभ घेतला. 'मन की बात' च्या या १३५ व्या भागाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात राबविण्यात येत असलेल्या विविध प्रेरणादायी उपक्रमांचा आढावा घेत नागरिकांना सामाजिक बांधिलकी जपत राष्ट्रनिर्माणात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, स्वच्छता, नवकल्पना, युवा शक्ती, महिला सक्षमीकरण, आत्मनिर्भर भारत आणि जनसहभागातून विकास या विषयांवर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. समाजाच्या सर्व स्तरांतील नागरिकांनी आपल्या परिसराच्या विकासासाठी पुढाकार घेण्याची गरज त्यांनी स्पष्ट केली. कार्यक्रमास माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी ज्ञानेश्वर भामरे, माजी जिल्हा परिषद सभापती लक्ष्मण पाटील यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी कार्यक्रम मनोभावे ऐकत पंतप्रधानांनी मांडलेले विचार प्रेरणादायी असल्याचे सांगितले. समाजहितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमध्ये अधिकाधिक लोकसहभाग वाढविणे, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता अभियान आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी 'मन की बात' च्या माध्यमातून समाजात सकारात्मक विचार आणि जनजागृती निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली.

# महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला नवी गती पालघरमधील मेगा प्रोजेक्ट्स ठरणार मैलाचा दगड!

मुंबई - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकासाला नवी गती देणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा प्रत्यक्ष आढावा घेत पालघर जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी वाढवण बंदर, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्प, देशातील पहिले प्रस्तावित ऑफशोअर विमानतळ जागा, मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गावरील मुंबई-वडोदरा इंटर जंक्शनची पाहणी करून उत्तन-विरार सागरी सेतू व नारिंगी खाडी पूल प्रकल्पाबाबतही सविस्तर चर्चा केली व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पातील बोईसर स्थानकाच्या निर्माणाधीन कामांची आणि प्रकल्प आराखड्याची पाहणी केली. कामाचा वेग, दर्जा आणि नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी चिंचणी येथील समुद्रकिनाऱ्यावर प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पाची पाहणी करताना अंतर्गत रस्त्यांचे जाळे, वन मंजुरी, वीजपुरवठा, रेल्वे कनेक्टिव्हिटी, भूसंपादन, पाणीपुरवठा, कौशल्य विकास तसेच मच्छीमारांच्या नुकसानभरपाईसंदर्भातील कामांचा सविस्तर आढावा घेतला. सुमारे ७६,२२० कोटींच्या खर्चाच्या या ग्रीनफिल्ड बंदराची उभारणी १४४८ हेक्टर क्षेत्रावर होणार असून पुढील ६० महिन्यांत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अत्याधुनिक 'नेक्स्ट जनरेशन' जहाजे हाताळण्याची क्षमता असलेले हे बंदर भारतातील सर्वात मोठ्या खोल समुद्री बंदरांपैकी एक ठरणार आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी देशातील पहिल्या प्रस्तावित ऑफशोअर विमानतळाच्या जागेचीही पाहणी केली. या विमानतळाला डीएफसी (Dedicated Freight Corridor), बुलेट ट्रेन, उत्तन-विरार सी-लिंक, मुंबई-वडोदरा द्रुतगती मार्ग आणि मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाची जोडणी (connectivity) राहणार आहे. यामुळे वाढवण व मुरबे बंदरांमधील मालवाहतुकीला मोठी चालना मिळणार आहे. तसेच मुंबई विमानतळावरील वाढता प्रवासी ताण कमी करण्यासाठीही हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी एमएमआरडीए मार्फत उभारण्यात येणाऱ्या नारिंगी खाडी पुलाच्या कामाचाही आढावा घेतला. सुमारे ८५० कोटी खर्चाच्या या ४.१० किलोमीटर लांबीच्या आणि १२ मीटर रुंदीच्या पुलामुळे वसई-विरारचा सफाळे, पालघर आणि बोईसर या शहरांशी थेट संपर्क प्रस्थापित होणार असून प्रवासाचे अंतर सुमारे ४० किलोमीटरने आणि वेळ ४५ मिनिटांनी कमी होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तन-विरार सागरी सेतू प्रकल्पाबाबत सविस्तर चर्चासुद्धा केली. सुमारे ५८,७५४.५१ कोटी खर्चाच्या या सहापदरी सागरी सेतूला चारपदरी जोडरस्ते आणि दोन्ही बाजूंना आपत्कालीन मार्गिका प्रस्तावित आहेत. या सेतूची थेट जोडणी मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाशी होणार असल्याने दक्षिण मुंबई ते अहमदाबाद दरम्यानचा प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि सुलभ होणार आहे.

मुंबई-दिल्ली द्रुतगती मार्गावरील मुंबई-वडोदरा इंटर जंक्शनची पाहणी - मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी देशातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक असलेल्या दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गाच्या मुंबई-वडोदरा इंटर जंक्शनची पाहणी करून प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करत त्यांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासह दर्जेदार कामांवर भर देण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या. भारत सरकारमार्फत सुमारे १ लाख कोटी खर्चून उभारण्यात येणारा सुमारे १४०० किलोमीटर लांबीचा, ८-पदरी ग्रीनफिल्ड क्सेस-कंट्रोल्ड दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्ग हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या ५ राज्यांना जोडणार आहे. हा मार्ग पूर्ण झाल्यानंतर दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा प्रवास मोठ्या प्रमाणात वेगवान होणार असून देशातील प्रमुख औद्योगिक पट्ट्यांमधील संपर्क अधिक सक्षम होणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. या प्रकल्पाचे वैशिष्ट्य म्हणजे जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) शी असलेली थेट जोडणी. त्यामुळे उत्तर भारतातून जेएनपीएपर्यंत मालवाहतूक अधिक जलद, कार्यक्षम आणि कमी खर्चात होणार असून देशाच्या लॉजिस्टिक साखळीला मोठी बळकटी मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्रातील वडोदरा-मुंबई विभाग १५७ किलोमीटर लांबीचा असून, त्यासाठी सुमारे २४,००० कोटी खर्च करण्यात येत आहे. ७ बांधकाम पॅकेजमध्ये विकसित होणाऱ्या या विभागातील ५ पॅकेजचे काम पूर्ण झाले असून ते वाहतुकीसाठी सज्ज आहेत, तर उर्वरित २ पॅकेज ऑगस्ट २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहेत. महाराष्ट्रातील हा संपूर्ण मार्ग ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

हा मार्ग सुरू झाल्यानंतर वडोदरा ते मुंबई प्रवासाचा कालावधी ८ तासांवरून सुमारे ४ तासांपर्यंत कमी होणार आहे. यामुळे प्रवाशांना वेगवान, सुरक्षित आणि वाहतूक कोंडीमुक्त प्रवासाचा अनुभव मिळणार असून व्यावसायिक वाहतुकीलाही मोठी चालना मिळेल. जेएनपीएकडे जाणाऱ्या मालवाहतुकीची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या वाढणार आहे. सध्या ठाणे, भिवंडी आणि घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे होणारा वेळ व इंधनाचा अपव्यय कमी होऊन मालवाहतुकीसाठी अधिक जलद आणि विश्वासार्ह पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. उत्तर आणि पश्चिम भारतातील औद्योगिक क्षेत्रांना मुंबईच्या बंदर व्यवस्थेशी अधिक सक्षम जोडणी मिळाल्याने निर्यात, उद्योग, गुंतवणूक आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळणार आहे. तसेच हा प्रकल्प देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबई यांना अधिक वेगवान व आधुनिक द्रुतगती मार्गाने जोडणारा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार असून, भारताच्या पायाभूत सुविधा विकास आणि आर्थिक प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देणारा ठरेल असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. राज्यातील बंदर, वाहतूक, उद्योग, निर्यात आणि रोजगारवाढीच्या दृष्टीने हे सर्व प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणार आहेत. यावेळी मंत्री गणेश नाईक, मंत्री नितेश राणे, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावित, आमदार स्नेहा दुबे पंडित व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## होळनांथे येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल मध्ये पालक परिचय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



शिरपूर - तालुक्यातील होळनांथे येथील आर. सी. पटेल इंग्लिश मीडियम सीबीएसई स्कूल मध्ये पालक परिचय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर दि. २७ जून २०२६ रोजी पालक परिचय कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात मुख्याध्यापिका श्रीमती भूमिका गर्ग यांनी पालकांना शाळेची कार्यपद्धती, शैक्षणिक धोरणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. यावेळी शाळेची दैनंदिन कार्यपद्धती, वर्गांचे वेळापत्रक, परीक्षा नियोजन, नियमित उपस्थितीचे महत्त्व, अनुपस्थिती व पूर्वपरवानगीने रजा घेण्याची प्रक्रिया, विद्यार्थ्यांची शिस्त, स्वच्छता, आरोग्यदायी सवयी, सुरक्षितता तसेच नीटनेटका गणवेश व शूज परिधान करण्याचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्यासाठी ऑलिम्पियाड परीक्षा, विविध स्पर्धात्मक संधी, मूल्यसंस्कार, वृत्तपत्र वाचन उपक्रम, वाढदिवस समाजोपयोगी पद्धतीने साजरा करण्याची संकल्पना, विद्यार्थी पोर्टफोलिओ आणि शाळा-पालक यांच्यातील प्रभावी समन्वयाचे महत्त्वही पालकांना समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमानंतर इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व वर्गशिक्षकांनी आपल्या वर्गातील पालकांशी संवाद साधत विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम, मूल्यमापन पद्धती, वर्गातील नियम, शैक्षणिक अपेक्षा आणि प्रगती याबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच पालकांच्या विविध शंकांचे समाधान करून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. पालक, शिक्षक आणि शाळा यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम अत्यंत नियोजनबद्ध व उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## अमरिशभाई आर. पटेल सीबीएससई स्कूल मध्ये नर्सरीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत



शिरपूर - शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित शहरातील अमरिशभाई आर. पटेल सीबीएससई स्कूल मध्ये नर्सरीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी शाळेत नर्सरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे पारंपरिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांचे औक्षण करून व तिलक लावून त्यांच्या शालेय जीवनाच्या नव्या प्रवासाला मंगलमय प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्राचार्या श्रीमती स्मिता उगले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यारंभ संस्कार उत्साहात पार पडला. या संस्कारामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या प्रवासाची शुभ सुरुवात करण्यात आली. चिमुकल्यांसाठी पाम प्रिंटिंग आणि तांदळावर अक्षर ट्रेसिंग या सर्जनशील उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंदाने सहभाग घेतला. खेळता-खेळता शिकण्याच्या या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

पहिल्या दिवसाची आठवण कायमस्वरूपी जपली जावी यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला सशाच्या चेहऱ्याच्या आकाराचे आकर्षक लॉलीपॉप तसेच शालेय दप्तर भेटवस्तू म्हणून देण्यात आले. या अनोख्या भेटींमुळे चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. या आगळ्या-वेगळ्या स्वागत समारंभामुळे विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांच्यामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. प्रेमळ स्वागत, संस्कारमय वातावरण आणि नाविन्यपूर्ण उपक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नवीन शैक्षणिक वर्षाची आनंददायी, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय सुरुवात झाली.

# कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे. यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (DLC) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे. कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे. माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील. आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे. एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ॲग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे. आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल. या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

– काशीबाई थोरात-धायगुडे
(वरिष्ठ सहायक संचालक)

# उप्परपिंड येथील शिवसेना उबाठा गटाच्या असंख्य युवा युवा पदाधिकारी यांचा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते भाजपा मध्ये जाहीर प्रवेश

शिरपूर – शिरपूर तालुक्यातील उप्परपिंड येथील शिवसेना (उबाठा) गटाच्या असंख्य युवा पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. जनक विला, शिरपूर येथे शनिवार, दि. २७ जून २०२६ रोजी सायंकाळी झालेल्या प्रवेश सोहळ्यात माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा आणि माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी नवप्रवेशितांचे स्वागत करून भारतीय जनता पक्षाच्या विकासाभिमुख विचारसरणीवर विश्वास व्यक्त केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. केंद्र व राज्य शासनाच्या जनकल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भूपेशभाई पटेल यांनी पक्षात प्रवेश केलेल्या युवकांचे स्वागत करताना सांगितले की, युवा शक्तीच्या सहभागामुळे संघटनात्मक कामाला अधिक गती मिळेल. आगामी काळात विकासकामे आणि जनसेवा अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, बाजार समिती सभापती के.डी.पाटील, साखर कारखाना चेअरमन माधवराव पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, कारखाना उपाध्यक्ष दिलीपभाई पटेल, उप्परपिंड माजी उपसरपंच आनंदसिंग दौलतसिंग राजपूत, माजी उपसरपंच इंद्रसिंग दौलतसिंग राजपूत, माजी पंचायत समिती सदस्य चंद्रकांत पाटील, माजी उपसरपंच भुरा पाटील, शिरपूर शहर व तालुक्यातील अनेक पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यावेळी उप्परपिंड येथील शिवसेना (उबाठा गट) उपतालुका अध्यक्ष प्रशांत बाबुराव पाटील, दिनेश रमेश पाटील, खंडू वंजी पाटील, निंबा पाटील, दिनेश उत्तम पाटील, युवराज बाजीराव पाटील, विष्णू हिरामण भिल, धनराज भाईदास कोळी, विरसिंग राजेंद्र राजपूत, अमृत आनंदा पाटील, स्वप्नील दिलीप पाटील, गजेंद्र भगवान भिल, भाईदास सुका कोळी, राजेंद्र नथू पाटील, हरिश्चंद्र रविंद्र पाटील, सुनिल दाजभाऊ भिल, मनिष नागराज पाटील, उदेसिंग गोबा राजपूत, प्रविण आप्पा राजपूत, चेतन श्रीराम पाटील, प्रमोद झुंबरलाल कोळी, शशीकांत नानाभाऊ कोळी, दिलसिंग रामसिंग भिल, रोहित धनसिंग राजपूत, योगेश श्यामसिंग राजपूत, दरबार बारकू राजपूत, दारासिंग देविसिंग राजपूत, किशोर दादाभाई राजपूत यांच्यासह अनेक युवकांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या पक्षप्रवेशामुळे उप्परपिंड परिसरात भारतीय जनता पक्षाचे काम मोठ्या जोमात करणार असल्याची भावना उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## नागेश्वर येथे सोमवारी दि. २९ जून रोजी, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या भूमिपूजनाचा सोहळा

शिरपूर – वटपौर्णिमेच्या पावन पर्वाचे औचित्य साधून लोककल्याणकारी राज्यकारभार, न्यायप्रियता आणि जनसेवेचा आदर्श निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या पूर्णाकृती भव्य पुतळ्याच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता पुण्यभूमी श्री नागेश्वर सेवा संस्थान, नागेश्वर येथे करण्यात आले आहे. माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा तसेच प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन व शिरपूर-वरवाडे नगर परिषदेचे गटनेते, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास आमदार काशिराम दादा पावरा व माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून विविध क्षेत्रातील मान्यवर, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅन्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय - घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे - ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर - भ्रमणध्वनी - ९४२२७९८०९३ / ९०८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार - ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)